**वाहन अपघात झाल्यावर मोटार वाहन कायद्याच्या कलम १५८ (६) ची अंमलबजावणी करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**

गृह विभाग

परिपत्रक क्र. टिआरए ११०९/२०१०/प्र.क्र. ११६/पोल-८,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १९ जानेवारी, २०१०.

<u>पहावे</u> :- १) प्रधान सचिव, गृह विभाग यांनी पोलीस महासंचालक यांना पाठविलेले अर्ध शासकीय पत्र क्रमांक विपप्र-११०६/२२६४६/सीआर ६४२/पोल-८, दिनांक २३.११.२००६,

२) शासन परिपत्रक क्रमांक टिआरए ११०९/प्र.क्र. २८७/पोल-८, दिनांक २७.११.२००९

## <u>परिपत्रक</u>

मोटार वाहन अपघातात जखमी झालेल्या व्यक्तींना/मृत पावलेल्या व्यक्तींच्या नातेवाईकांना तातडीने नुकसान भरपाई मिळण्याच्या दृष्टीकोनातून अपघाताचा माहिती अहवाल (AIR) तयार करणे, FIR नोंदविणे, मोटार अपघात दावा न्यायाधिकरणात आवश्यक कागदपत्रे पाठविणे इत्यादिबाबत मोटार वाहन कायद्याच्या कलम १५८ (६) मध्ये सूचना देण्यात आलेल्या आहेत. या अनुषंगाने कार्यवाही करण्याबाबत संदर्भाधिन अर्ध शासकीय पत्र व परिपत्रकान्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

२. दरम्यान या विषयाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयात स्पेशल लिव्ह पिटिशन क्र. ११८०१ ते ११८०४/२००५ वर कार्यवाही सुरु होती. त्यावर मा. सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १७.१२.२००९ रोजी निकाल देऊन पोलीस, मोटार अपघात दावा न्यायाधिकरण तसेच विमा कंपन्यांना काही निदेश/ सूचना दिलेल्या आहेत. त्यापैकी पोलीसांना दिलेल्या निदेशानुसार खालीलप्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना आता देण्यात येत आहेत :-

१) मोटार वाहन नियम, १९८९ मधील नियम १५० मध्ये विहित करण्यात आलेल्या फॉर्म क्र. ५४ मधील अपघात माहिती अहवाल (AIR) तात्काळ/जास्तीत जास्त ३० दिवसांच्या आत न चुकता संबंधित मोटार अपघात दावा न्यायाधिकरणात, संबंधित पोलीस स्टेशन प्रमुखाने उपलब्ध करुन द्यावा. या व्यतिरिक्त पोलीसांनी अपघातात सापडलेल्या व्यक्तींचे वय, उत्पन्न, व त्यांच्यावर अवलंबून असलेल्या त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची नावे व वये याबाबतची माहितीही AIR मध्ये मोटार अपघात दावा न्यायाधिकरणास द्यावी.

२) AIR सोबत FIR, घटना स्थळाचे छायाचित्र, जागेचा नकाशा, वाहन चालकाचा परवाना, वाहनाचे विमा प्रमाणपत्र (आवश्यकता वाटल्यास वाहनाचे फिटनेस प्रमाणपत्र).